नवराष्ट्र

महोत्सव राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे मत

# 'मॉडर्न महाविद्यालयाचा प्रवास विद्यापीठाच्या दिशेने'

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'मॉडर्न महाविद्यालयाला सगळे बेस्ट अवार्ड मिळाले आहेत.महाविद्यालयाचा प्रवास विद्यापीठाच्या दिशेने सुरु असल्याचे राज्यपाल 'मॉडर्न महाविद्यालयाला सगळे बेस्ट अवार्ड मिळाले आहेत. महाविद्यालयाचा प्रवास विद्यापीठाच्या दिशेने सुरु असल्याचे मत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी व्यक्त केले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, (स्वायत्त) शिवाजीनगर पुणे, महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ पडला. यावेळी प्रमुख पाहुणे राज्यपाल भगत सिंह कोश्यारी हे उपस्थित होते.मॉडर्न महाविद्यालयाला सगळे बेस्ट अवार्ड मिळाले आहेत.महाविद्यालयाचा प्रवास विद्यापीठाच्या दिशेने सुरु असल्याचे राज्यपाल आपल्या भाषणात म्हणाले. संशोधनाची आपली परंपरा अतिशय जुनी आहे . पुराणातील महत्त्वाचे संशोधन म्हणजे पुष्पक विमान असल्याचा उल्लेख त्यांनी केला.आजच्या काळात सुध्दा अशा नाविन्यपूर्ण संशोधनाला अतिशय महत्त्व आहे. आधुनिकता आणि परंपरा यांचा संगम शिक्षणात असणे आवश्यक आहे. नवीन शिक्षण पद्धतीत भारतीय भाषांना महत्त्वाचे स्थान आहे.



त्यामुळे इंग्लिश या ज्ञान भाषेबरोबर मातृभाषा जपणे महत्त्वाचे आहे.आपण आपल्या देशातील चांगल्या गोष्टी जगभर पोहोचवणे आवश्यक आहे असे ते म्हणाले. 'मॉडर्न महाविद्यालयाला स्वायत्तता मिळाल्यामुळे अधिकाधिक उत्तम शिक्षण देणे शक्य आहे असे ते म्हणाले. आपले ज्ञान वाढवून आपण सूर्य सारखे ते सर्वत्र पसरवावे असा संदेश त्यांनी दिला. महाविद्यालयाला सेंटर ऑफ excellence बनवायचं असेल तर खूप प्रगती करावी लागेल. 'मॉडर्न' हे नावाप्रमाणे आधुनिक तर आहेच पण ते मॉडेल कोलेज सुद्धा आहे. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ.गजानन एकबोटे यांनी मनोगत व्यक्त केले. मॉडर्न महाविद्यालय समाजातील तळागाळातील विद्यार्थ्यांना शिक्षण देते.संस्थेने समाजाचे हित नेहमीच पहिले आहे.आधुनिक काळात शिक्षण हे कवच कुंडलासारखे काम करते.विद्यार्थी त्यामुळे सक्षम तर होतातच शिवाय देशाच्या जडणघडणीत ते आपले योगदान देतात. महाविद्यालयाला स्वायत्तेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करता येतात पण हवे तसे स्वांतत्र्य अजूनही प्राप्त झाले नसल्याची खंत यावेळी त्यांनी व्यक्त केली.

सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त या कार्यक्रमामध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळेचे उद्घाटन डिजिटल पद्धतीने करण्यात आले.केंद्रीय विज्ञान तंत्रज्ञान मंत्रालयाकडून 'डीएसटी-फिस्ट' अंतर्गत मिळालेल्या सुमारे दीड कोटी रुपयाच्या निधीतून महाविद्यालयात क्रेमेटोग्राफिची अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे.या प्रयोगशाळेचा फायदा पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत संशोधकांना होणार आहे.या प्रयोगशाळेचे उद्घाटन मा.राज्यपाल कोश्यारी यांच्या हस्ते झाले.यासोबतच कोविड काळात विद्यार्थी,पालक आणि इतर प्रशासकीय कामकाजासाठी महाविद्यालयात येणारे विजीटर यांना सहज